आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता

८ जानेवारी २०२५ - बुधवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- रस्ते अपघातातल्या जखमींसाठी दीड लाखापर्यंतचे उपचार रोखमुक्त करण्याच्या योजनेला सुरुवात, हिट अँड रनमधल्या मृतांच्या वारसांना २ लाख रुपयांची आर्थिक मदत
- मराठी आणि प्राकृतला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यानंतर पात्र असलेले लाभ देण्याची राज्याची केंद्र सरकारकडे मागणी
- गुजरातमध्ये झालेल्या अपघातात पालघरच्या तीन तरुणांचा मृत्यू, चार जण गंभीर जखमी

**आणि**

- मलेशिया खुल्या बॅडमिंटन स्पर्धेच्या उपउपांत्यपूर्व फेरीत भारताच्या ५ खेळाडूंचा प्रवेश

**<><><><><>**

रस्ते अपघातातल्या जखमींसाठी रोखमुक्त उपचार देणारी योजना केंद्र सरकारनं आजपासून सुरू केली. याअंतर्गत दीड लाख रुपयांपर्यंतचे उपचारांसाठी कोणतीही रोख रक्कम द्यावी लागणार नाही. याशिवाय हिट अँड रनमध्ये मृत्यू झालेल्यांच्या वारसांना २ लाख रुपयांपर्यंतची आर्थिक मदत दिली जाईल. केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी नवी दिल्लीत आज ही घोषणा केली.

गेल्यावर्षभरात देशभरात रस्ते अपघातात १ लाख ८० हजार व्यक्तींचा मृत्यू झाला. त्यापेैकी ३० हजार जण हेल्मेट न घातल्यानं मृत्यूमुखी पडले. मृतांमध्ये ६६ टक्के तरुण होते अशी माहिती गडकरी यांनी दिली.

**<><><><><>**

मराठी आणि प्राकृतला अभिजात भाषेचा दर्जा देण्यासोबतच मिळणारे इतर लाभ देण्याची विनंती राज्य सरकारनं आज केंद्राला केली. मराठी भाषा मंत्री उदय सामंत यांनी आज केंद्रीय सांस्कृतिक मंत्री गजेंद्रसिंग शेखावत यांची भेट घेतली. त्यावेळी यासंदर्भात ४ ऑक्टोबर रोजी प्रसिद्ध झालेल्या राजपत्राची प्रत शेखावत यांनी सामंत यांना सुपूर्द केली. मराठी, पाली, प्राकृत, आसामी आणि बांग्ला या भाषांना अभिजात दर्जा दिल्याचा उल्लेख त्यात आहे. अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यानंतरचे लाभ मिळण्यासाठी आवश्यक प्रस्ताव २-३ आठवड्यात सादर करु असं सामंत म्हणाले.

**होल्ड- बाईट - उदय सामंत**

महाराष्ट्रासह इतर राज्यात तसंच विदेशातही मराठी भाषेचं जतन संवर्धन करण्यासाठी विविध प्रयत्न केले जाणार असल्याची माहिती राज्य सरकारनं नियुक्त केलेल्या समितीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर मुळे यांनी दिली.

**होल्ड - बाईट – मुळे**

**<><><><><>**

पालघरच्या तीन तरुणांचा आज सकाळी गुजरातमध्ये झालेल्या अपघातात मृत्यू झाला. हे तिघेही राजस्थानच्या अजमेर शरीफ दर्गा इथे गेले होते. तिथून परतताना वाटेत गुजरात इथे अंकलेश्वर जिल्ह्यात त्यांच्या गाडीला ट्रकची धडक बसून अपघात झाला. या अपघातात अन्य चार जण गंभीर जखमी झाले असून त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे.

आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता

८ जानेवारी २०२५ - बुधवार

**<><><><><>**

अलिबाग इथल्या समुद्रात आक्षी साखर भागात 'हिरकन्या' ही मच्छीमारी बोट सोसाट्याच्या वाऱ्यामुळे बुडाल्याची घटना घडली. दुसऱ्या मच्छीमारी बा◌ेटीतल्या खलाशांनी वेळीच प्रसंगावधान राखून मदत केल्यानं १५ खलाशांचा जीव वाचला आहे.

**<><><><><>**

मुंबई महानगरपालिकेनं नूतनीकरण केलेल्या भाऊ दाजी लाड संग्रहालयाचं लोकार्पण आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते झालं. संग्रहालयाच्या माध्यमातून सांस्कृतिक श्रीमंतीचे दर्शन होत असून आपला ऐतिहासिक वारसा भावी पिढीला पाहता यावा हा संग्रहालय उभारणीचा उद्देश आहे असं मुख्यमंत्र्यांनी म्हटलं आहे.

**<><><><><>**

श्रीजनी फाउंडेशनच्या संस्थापिका वीणा उपाध्याय यांना  राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी ३१ वा 'जानकीदेवी बजाज पुरस्कार' प्रदान केला.  आयएमसी चेंबरच्या महिला विभागातर्फे हा पुरस्कार दिला जातो. **वीणा उपाध्याय यांनी** बावनबुटी साडी विणणाऱ्या महिला कारागिरांना प्रोत्साहन देऊन या कलेचं पुनरुज्जीवन केलं आणि बिहारमधल्या  ग्रामीण महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम केलं. यासाठी हा पुरस्कार त्यांना दिला गेला.

**<><><><><>**

भारत देश एक आधुनिक, सर्वसमावेशक आणि प्रगतीशील समाज निर्माण करण्यासाठी दीर्घकालीन आव्हानांचा सामना करत सर्वात मोठा लोकशाही देश म्हणून यशस्वीपणे प्रवास करत आहे, असं प्रतिपादन केंद्रीय परराष्ट्र मंत्री डॉ. एस. जयशंकर यांनी केलं. १८ व्या 'प्रवासी भारतीय दिवस' अधिवेशनाला आज सकाळी ओडिशातल्या भुवनेश्वर इथं सुरुवात झाली. त्यावेळी ते संबोधित करत होते. 'विकसित भारतासाठी प्रवासी भारतीयांचं योगदान' ही यंदाच्या अधिवेशनाची संकल्पना आहे.

या अधिवेशनात सुमारे ७५ देशातले सहा हजार पेक्षा अधिक अनिवासी भारतीय सहभागी होत आहेत. जगभरातून आलेल्या प्रतिनिधींना ओडिशा राज्याची संस्कृती आणि समृद्ध वारसा दाखवण्याचा प्रयत्न राज्य सरकारनं या अधिवेशनाच्या माध्यमातून केला आहे.

**<><><><>**

माजी राष्ट्रपती प्रणव मुखर्जी यांचं स्मारक उभारण्यासाठी सरकारनं राजघाट परिसरातल्या राष्ट्रीय स्मृती संकुलामध्ये एक जागा निश्चित केली आहे. दिवंगत माजी राष्ट्रपतींच्या कन्या शर्मिष्ठा मुखर्जी यांनी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची भेट घेतली आणि या निर्णयाबद्दल त्यांनी सरकारचे आभार मानले.

**<><><><>**

हवाई दलाचे प्रमुख अमर प्रीत सिंग यांनी आज नवी दिल्लीत राष्ट्रीय छात्रसेनेच्या प्रजासत्ताक दिन शिबीरात  सहभाग घेतला. छात्रसेना देशाला एकसंध ठेवण्याचं काम करत असल्याचं त्यांनी यावेळी म्हटलं. यावेळी त्यांनी तरुणांना छात्रसेनेमध्ये येण्यासाठी प्रोत्साहित केलं.

<><><><>

केंद्र सरकारने इस्त्रोचे नवे अध्यक्ष आणि अंतराळ विभागाचे सचिव म्हणून व्ही नारायण यांची नियुक्ती केली आहे. इस्त्रोचे विद्यमान अध्यक्ष एस सोमनाथ यांच्याकडून १४ जानेवारी रोजी ते पदभार स्वीकारतील. व्ही नारायण हे केरळमधल्या इस्त्रोच्या लिक्विड प्रोपल्शन सिस्टम सेंटरचे संचालक आहेत. १९८४ मध्ये ते इस्त्रोमध्ये रुजू झाले.

<><><><>

आसाममध्ये दिमा हासाओ जिल्ह्यातल्या उमरंगसो इथे पूरग्रस्त कोळसा खाणीत अडकलेल्या एका कामगाराचा मृतदेह भारतीय नौदलाच्या २१ पॅरा डायव्हर्सने बाहेर काढला. ही व्यक्ती नेपाळची नागरिक असल्याची माहिती मिळत आहे. या खाणीत अडकलेल्या अन्य कामगारांना बाहेर काढण्याचं काम अद्याप सुरू आहे. ही कोळसा खाण मेघालयच्या सीमेजवळ असून त्यात बेकायदेशीर रित्या खाणकाम सुरू होतं. आसाम सरकारने नौदलाच्या पाणबुड्यांना बचावकार्यासाठी पाचारण केलं असून उर्वरित खाण कामगारांना वाचवण्याचे प्रयत्न सुरू आहेत.

<><><><>

धुळे जिल्ह्यातल्या साक्री तालुक्यात म्हसदी इथं पोलिसांनी एका वाहनासह ७७ लाख २० हजार रुपये किंमतीचा बनावट मद्यसाठा जप्त केला आहे. हा मद्यसाठा बेकायदेशीरपणे विक्री करण्याच्या उद्देशानं म्हसदी गावातल्या जयेश गुंजाळ यानं आणला असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती, त्यानुसार त्यांनी ही कारवाई केली. या प्रकरणी गुंंजाळविरोधात गुन्हा दाखल केल्याची माहिती पोलिसांनी दिली.

<><><><><>

सिंधुदुर्ग जिल्ह्यातल्या कुडाळ इथं २७ व्या बाबा वर्दम स्मृती नाट्य महोत्सवाला काल रात्री सुरुवात झाली. ज्येष्ठ अभिनेते प्रसाद पंडित यांच्या हस्ते या महोत्सवाचं उदघाटन झालं. नाट्यकर्मी बाबा वर्दम यांच्या जन्मदिनानिमित्तानं दरवर्षी या नाट्यमहोत्सवाचं आयोजन करण्यात येतं. सात ते तेरा  जानेवारी दरम्यान होणाऱ्या या नाट्य महोत्सवात राज्यासह गोवा, मध्यप्रदेश आदी राज्यांमधली निवडक सात नाटकं सादर होणार असल्याची माहिती आमच्या बातमीदारानं दिली.

<><><><><>

बांगलादेशाच्या इमिग्रेशन आणि पारपत्र विभागाने बेपत्ता झालेल्या आणि गेल्या वर्षी जुलै महिन्यात झालेल्या हत्याकांडात कथित सहभागामुळे माजी प्रधानमंत्री शेख हसीना यांच्यासह ९७ जणांची पारपत्रं रद्द केली आहेत. बांगलादेश सरकारच्या मुख्य सल्लागारांचे उपसचिव अब्दुल कलाम आझाद यांनी ही माहिती वार्ताहर परिषदेत दिली आहे. यापैकी २२ जणांची पारपत्र बांगलादेशाहून स्वतःहून बेपत्ता झाल्यामुळे तर ७५ जणांची पारपत्र जुलैमध्ये झालेल्या हत्याकांडात सहभागी झाल्यामुळे रद्द झाल्याची माहिती त्यांनी दिली. शेख हसीना यांच्यावरही या हत्याकांडात सहभागी असल्याचा आरोप आहे. मात्र, शेख हसीना यांच्याखेरीज अन्य कुठल्याही व्यक्तिचं नाव आझाद यांनी उघड केलेलं नाही, अशी माहिती बांगलादेशाच्या स्थानिक वृत्तसंस्थेने दिली आहे.

<><><><><>

क्वालालंपूर इथे सुरू असलेल्या मलेशिया खुल्या बॅडमिंटन स्पर्धेच्या पुरुष एकेरीच्या उपउपांत्यपूर्व फेरीत एच. एस. प्रणॉय याने प्रवेश केला. त्यानं कॅनडाच्या ब्रायन यांग २१-१२, १७-२१, २१-१५ असा पराभव केला. उपांत्यफेरीत त्याची लढत चीनच्या फेंग लीसोबत होणार आहे.

या स्पर्धेच्या मिश्र दुहेरी प्रकारात भारताच्या ध्रुव कपिला आणि तनिषा कस्ट्रो यांनी आज उपउपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला. त्यांनी दक्षिण कोरियाच्या सुंग ह्युन को आणि हे वोन इओम यांचा २१-१३, २१-१४ असा सरळ गेममध्ये पराभव केला. आद्या वरियथ आणि सतीश करुणाकरन या अन्य एका भारतीय जोडीनेही मिश्र दुहेरीच्या उपउपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला आहे. त्यांनी आज भारताच्याच अमृता प्रथमेश आणि अशित सूर्या यांचा २१-१३, २१-१५ असा पराभव केला.

महिला एकेरीत भारताच्या मालविका बनसोड हिने स्पर्धेची दुसरी फेरी गाठली आहे. तिने आज मलेशियाच्या जिन वेई गोह हिचा २१-१५, २१-१६ असा सरळ गेममध्ये पराभव केला.